**MHKO120001452015**

<u>नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०१५</u>
(CNR No.MHKO120001452015)

## <u>निशाणी क्र.११४ खाली आदेश</u>

वादी यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७ प्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा त्यांनी प्रतिवादीविरुद्ध तुटक वाटणी होवुन कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार, वादीने सी.पी.सी.ऑर्डर ५ रुल २०(A) प्रमाणे निशाणी क्र.१०८ वर अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र.१५ यांचे समन्स बजावणी होणेची विनंती केली आहे. परंतू वादीच्या कथनानुसार सदर अर्ज सी.पी.सी.ऑर्डर ५ रुल २०(१) प्रमाणे दाखल करणे गरजेचे होते. सबब वादीने निशाणी क्र.१०८ मध्ये 'सी.पी.सी.ऑर्डर ५ रुल २०(A) प्रमाणे' ऐवजी 'सी.पी.सी.ऑर्डर ५ रुल २०(१)' प्रमाणे अशी दुरुस्ती करणेस परवानगी देणेची विनंती केली आहे. सबब, वादीने त्या अनुषंगाने निशाणी क्र.१०८ वरील अर्जात दुरुस्ती करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी तर्फे श्री. एस.बी.पाटील यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज चुकीचा असलेने तो नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

०४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा दुरुस्तीच्या अर्जाच्या कामी दाव्यातील गुणदोषांवर भाष्य करणे योग्य ठरत नाही व प्रस्तुत दुरुस्तीच्या अर्जाने जर दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होत असेल व प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी मदत होणार असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच, सदर दुरुस्तीनंतर प्रतिवादींना सुद्धा त्यांचे म्हणणे

सादर करण्याची संधी मिळणार आहे. तसेच प्रकरणामध्ये दावा मिळकतीशी संबंधीत सर्व माहिती अभिलेखावर असणे अत्यावश्यक आहे.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ६, नियम १७ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशारितीने फेरबदल करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. त्यामुळे, प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी सदर मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील नेमल्या तारखेपर्यंत अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्याच्या निशाणी क्र.१०८ वरील अर्जामध्ये दुरुस्ती करावी.

३. वादीने निशाणी क्र.१०८ ची दुरुस्त प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.07.03 16:15:54 +0530

दिनांक. ०१/०७/२०२३.
ठिकाण. गारगोटी.

**( व्ही. बी. मुल्ला )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.